2019-20

Savitribai Phule Pune University, Pune

# JAT Arts Science & Commerce College

(For Women) Malegaon, Nashik

One Day Multidisciplinary National Conference on

## Gender Equality & Women Empowerment

On Saturday, 15th February 2020

**Organized by Politics Department**

# Certificate

OF RESEARCH PAPER PUBLICATION & PRESENTATION


This certificate is awarded to Prof./Dr./Mr./Miss प्रा. अशोक राझु. जाधव Of म.स.प्र.मं. महिला महाविद्यालय मा. कॅम्प. for active participation in One Day Multidisciplinary National Conference on "Gender Equality & Women Empowerment" on 15thFebruary 2020, organized by Politics Department of J.A.T. Arts, Science And Commerce College [For Women], Malegaon. She/ He has been awarded Certificate of Publication of Research Paper Publication & Presentation entitled "संगीत व स्त्री असमानता" Published in International Multidisciplinary UGC CARE Listed Journal for Research Publication OUR HERITAGE – Peer Reviewed Refereed Indexed UGC CARE List Group- B, Vol- 68, Issue-35, February -2020: Special Issue on Multidiscir linary Studies, bearing ISSN: 0474-9030, Impact Factor 6.8.

| | | |
|---|---|---|
| Dr. Salma Ab. Sattar | Dr. Lodhi Kaniz Fatma Niyaz Ah. | Dr. Ansari Md. Haroon Md. Ramzan |
| Coordinator | HOD / Organizing Secretary | Principal/ Convener |

Scanned with CamScanner

International Multidisciplinary UGC CARE Listed Journal for Research Publication

PEER REVIEWED [REFEREED] INDEXED
UGC CARE LIST GROUP - B RESEARCH JOURNAL
VOL- 68, ISSUE-35, FEBRUARY -2020:
SPECIAL ISSUE ON MULTIDISCIPLINARY STUDIES



# GENDER EQUALITY AND WOMEN EMPOWERMENT

Chief Editor
**Dr. Ansari Md. Haroon Md. Ramzan**
J.A.T Arts, Science & Commerce College
[For Women], Malegaon, Nashik.

Executive Editor
**Dr. Lodhi Kaniz Fatima Niyaz Ahmad**

Associate Editor
**Dr. Saima Ab. Sattar**

Scanned with CamScanner

Vol-68 ISSUE-35
February – 2020
Special Issue on Multidisciplinary Studies

OUR HERITAGE
ISSN: 0474-9030
Impact Factor – 6.8

# "संगीत व स्त्री समानता"

प्रा. अशोक एस. जाधव

सहाय्यक प्राध्यापक व प्रमुख, संगीत विभाग,
एस. पी. एच. महिला महाविद्यालय, मालेगांव कॅम्प, जि. नाशिक 423105 (महाराष्ट्र)

सारांश :–

संगीत क्षेत्रात उच–नीच, जात, पंथ, धर्म या बाबींना विशेष असे महत्व नाही. स्त्री असो अथवा पुरूष, ज्याच्यामध्ये अपरिमीत गुणवत्ता आहे त्याला तितका न्याय या ठिकाणी मिळतो. श्रोत्यांच्या कसोटीवर खरे उतरणे केवळ एवढीच माफक अपेक्षा या ठिकाणी आहे. ज्याची कलाकृती सर्वोत्तम तोच श्रोत्यांच्या मनावर अधिराज्य गाजविणार मग ती स्त्री असो अथवा पुरूष. त्यामुळे लिंग भेद अथवा इतर कोणताही भेद या क्षेत्रात बघावयास तितकासा मिळत नाही. यावरून संगीत क्षेत्रात तरी स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीनेच मान, सन्मान, प्रतिष्ठा प्राप्त आहे. तेव्हा संगीत हे स्त्री समानतेचे पुरस्कर्ते माध्यम ठरते.

महत्वाचे शब्द :–

संगीत, स्त्री, समानता, सन्मान, प्रतिष्ठा.

प्रस्तावना :–

शास्त्रीय संगीत अथवा राग संगीत, उपशास्त्रीय संगीत, सुगम संगीत व लोक संगीतातील कलावंतांच्या नावांचा आढावा जरी घेतला तरी त्यावरून संगीत क्षेत्रात स्त्रीयांना समान सन्मान असल्याचे प्रत्ययास येते.

उदा.

1) शास्त्रीय संगीत : बेगम अख्तर, परवीन सुलताना, हिराबाई बडोदेकर, प्रभा अत्रे, कौशिकी चक्रवर्ती, किशोरी अमोणकर, रसुलनबाई, गिरिजादेवी इ.

2) उपशास्त्रीय संगीत – शोभा गुर्टू इ.

3) सुगम संगीत – भारतरत्न लता मंगेशकर, आशा भोसले, गीता दत्त, अनुराधा पौडवाल, सुमन कल्याणपूर, के. एस. चित्रा, कविता कृष्णमूर्ती इ.

4) लोकसंगीत – ईला अरूण, मालिनी अवस्थी, लोपमुद्रा मित्रा, शारदा सिन्हा, कल्पना, रजनीगंधा शेखावत इ.


Copyright© 2020

Scanned with CamScanner

वरील स्त्री कलाकारांच्या नावावर दृष्टीक्षेप जरी टाकला तरी संगीत क्षेत्रामध्ये त्यांच्या नावाचा किती मोठा सन्मानजनक दबदबा आहे हे आपल्या लक्षात येते

## विषय प्रवेश :–

संगीताला भाषा, प्रांत, जात, धर्म असे कोणतेही बंधन नसल्याने संगीत हे मनोरंजनाच्या स्तरावर वैश्विक आहे. जाणिवेच्या स्तरावर जगभरातले संगीत आनंददायकच आहे. यात दुमत असल्याचे कारण नाही. भारताबरोबरच इतर देशांतही संगीत क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून स्त्रीया काम करत असल्याचे आपणास दिसून येते. गायन, वादन तथा लेखनातही स्त्रीया प्रबळपणे काम करताना आढळून येतात. समाजकारण, शिक्षण क्षेत्र, राजकारण, नोकरी, व्यवसायाच्या विविध ठिकाणी स्त्रीयांचा भरणा मोठ्या प्रमाणावर असला तरीही संगीत क्षेत्रात असलेला तोलामोलाचा व बरोबरीचा मान हा लक्षणीय आहे.

आजच्या विकसीत तंत्रज्ञानाच्या युगात दृक–श्राव्य माध्यमांद्वारे आपण नित्य बघतो की स्त्रीयांचा संगीत क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर भरणा आहे. संगीत शिक्षणसुध्दा स्त्रीय मोठ्या प्रमाणावर घेताना दिसत असून शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी करीत आहेत.

गायक, वादक तसेच संगीतकार बनून राष्ट्रीय तसेच आंतराष्ट्रीय स्तरावर स्त्रीया चमकत असल्याचे आपण बघतो. स्त्री कलावंताच्या मैफिलींना पुरूष श्रोत्यांचाही भरणा तितकाच सारखेपणे असतो. स्त्री कलाकारांना त्यांच्या प्रतिभेनुसार दादसुध्दा मनसोक्तपणे मिळतांना दिसते.

चित्रपट संगीत क्षेत्रातील लता मंगेशकर व आशा भोसले ही नावे माहीत नाही किंवा त्यांच्या गायकीचा वेडा नाही असा अज्ञ पुरूष शोधून सापडणार नाही. पुरूष यासाठी की संगीत क्षेत्रात स्त्री पुरूष असा भेदच नाही. अतिगुणवान स्त्री कलावंतांना भारतभूमीने सदैव सन्मानच बहाल केला आहे.

## निष्कर्ष :–

संगीत क्षेत्रामध्ये स्त्री:पुरूष समानता असून या ठिकाणी स्त्रीया मनमोकळेपणाने वावरत असून, संगीत रसिकांचे पुरूषांच्या बरोबरीने मनोरंजन करीत आहेत. जाती–पाती, धर्म–पंथ, भेदभावाच्या भींती हटवून समता प्रस्थापित करण्यासाठी संगीत हेच सशक्त माध्यम आहे. गेल्या अनेक वर्षांत स्त्रीयांनी संगीत क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने स्वतःचे भक्कम स्थान निर्माण करून समताधिष्ठित मूल्यांचे फळ चाखले आहे.

## संदर्भ :–

1) संगीत विशारद – लेखक पं. लक्ष्मिनारायण गर्ग
3) इंटरनेट.


Copyright© 2020
Scanned with CamScanner